# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


दि.२०.०३.२०२३

## द्वितीय मुदतवाढ

### विषय :- गायीचे दुध पुरवठा करण्याबाबत.

मंदिरात होणाऱ्या दैनंदिन पूजा, अभिषेक तसेच कर्मचाऱ्यांसाठी चहाकरिता लागणारे गायीचे दुध **दि.३१.०३.२०२४** अखेरपर्यंत खरेदी करण्यासाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

वरील कामाकरिता अटी,शर्ती बाबतची माहिती व दरपत्रके डाउनलोड करण्यासाठी न्यासाच्या **www.siddhivinayak.org** या संकेत स्थळावर भेट द्यावी.

| | | |
|---|---|---|
| **दरपत्रके प्रसिद्धीचा दिनांक** | : | **बुधवार,दि.०८ मार्च,२०२३** |
| **दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक** | : | **शनिवार, दि.२५ मार्च,२०२३** |
| **दरपत्रके उघडण्याचा दिनांक** | : | **सोमवार, दि.२७ मार्च,२०२३** |

**अटी व शर्ती :-**

१) मूळ दरपत्रकात नमूद निर्देशाप्रमाणे (Specification) गाईच्या दुधाचा पुरवठा करण्यासाठी मोहरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

२) मान्य दरानेच दुधाचा पुरवठा करावा लागेल. कोणत्याही प्रकारची भाववाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही. याप्रकरणी न्यास व्यवस्थापन समितीचा निर्णय अंतिम राहील.

३) दुध स्वखर्चाने मंदिरात पोहोच करावा लागेल. न्यासाकडून वाहतुकीचा खर्च वेगळा दिला जाणार नाही.

४) सदर दुधाचा पुरवठा मागणीप्रमाणे रोजच्या रोज मंदिरात करावा लागेल.

५) दरपत्रकामध्ये कर वगळून प्रती लिटर दुधाच्या दराचा उल्लेख करावा. सरकारी नियमाप्रमाणे आवश्यक तेथे आयकर कपात केली जाईल.

६) उपरोक्त अटी व शर्ती काही बदल,सुधारणा करण्याचा वा जादा अटी शर्ती विहित करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवला आहे. आपली कोणतीही अट / अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाही.

७) दरपत्रकधाराने मोहरबंद दरपत्रकासोबत साक्षांकित करून सादर करावयाची कागदपत्रे.

अ) कंपनी नोंदणीचा दाखला

ब) ट्रेडिंग लायसन्स

क) आयकर नोंदणी पन कार्ड

ड) सेवाकर जी.एस.टी नोंदणी दाखला.

८) दुध पुरवठादाराचे दुकान स्वमालकीचे / भाडे कराराचे असावे. त्याबाबतचा पुरावा न्यासास सादर करणे आपल्यावर बंधनकारक राहील.

९) दरपत्रके भरतांना सर्व प्रकारचे कर व सर्विस कर मिळून एकत्रित रक्कम भरावी.

१०) कोणतेही कारण न देता दरपत्रक स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार न्यासास असेल.

११) कागदपत्रे सादर करण्यास असमर्थ ठरलेल्या दरपत्रकधारकाचे दरपत्रक निवडप्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

(नंदा मा. राऊत)
कार्यकारी अधिकारी